Crompton Greaves Consumer Electricals Limited
Registered & Corporate Office: Tower 3, 1st Floor,
East Wing, Equinox Business Park, LBS Marg,
Kurla (West), Mumbai - 400 070.India
T: +91 22 6167 8499   F: +91 22 6167 8383
W: www.crompton.co.in CIN: L31900MH2015PLC262254

Date: June 29, 2020

To, **BSE Limited ("BSE")**, Corporate Relationship Department, 2nd Floor, New Trading Ring, P.J. Towers, Dalal Street, Mumbai – 400 001.	To, **National Stock Exchange of India Limited ("NSE")**, "Exchange Plaza", 5th Floor, Plot No. C/1, G Block, Bandra- Kurla Complex, Bandra (East),Mumbai – 400 051.
BSE Scrip Code: 539876	**NSE Symbol: CROMPTON**
ISIN: INE299U01018	**ISIN: INE299U01018**
Our Reference: 47/2020-21	**Our Reference: 47/2020-21**

Dear Sir/Madam,

Sub: Compliance under Regulation 47 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations")

Pursuant to Regulation 30 and 47 of the Listing Regulations, please find enclosed newspaper clippings of the advertisement published on June 29, 2020 regarding dispatch i.e. sending of emails of Notice of 6thAnnual General Meeting of the Company together with Annual Report and instructions for remote e-voting in the following newspapers:

i. All India Edition of Financial Express
ii. Mumbai Edition of Loksatta

The newspaper publication is also uploaded and available on our website at the following link: https://www.crompton.co.in/investors/newspaper-publications/.

This is for your information and you are requested to bring this to the notice of your constituents.

Thanking You,

For Crompton Greaves Consumer Electricals Limited

PRAGYA KAUL

Digitally signed by PRAGYA KAUL
DN: c=IN, o=Personal, postalCode=400074, st=MAHARASHTRA, serialNumber=84c3cda8c48ae17c551bd8b9ee5a8312ce8ac0972726393186cb59193af2751f, cn=PRAGYA KAUL
Date: 2020.06.29 10:07:58 +05'30'

Pragya Kaul
Company Secretary & Compliance Officer

Encl: A/a

रुग्णवाढीचा दर ३ टक्के; दररोज शंभर बाधितांची भर

भांडुपमध्ये ५ जुलैपर्यंत कठोर टाळेबंदी

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : करोना संक्रमण आटोक्यात येत नसल्याने पूर्व उपनगरातील भांडुपमध्ये सुरू असलेल्या टाळेबंदीचा कालावधी ५ जुलैपर्यंत वाढविण्यात आला आहे. सध्या रुग्णसंख्येत भांडुप मुंबईत चौथ्या क्रमांकावर असून, या भागात दररोज १०० हून अधिक रुग्ण आढळून येत आहेत.

मुंबईतील रुग्णवाढीचा आणि रुग्ण दुप्पट होण्याचा वेग मंदावलेला असला तरी, टाळेबंदी शिथिल झाल्यानंतर काही भागांत संक्रमण वाढू लागले आहे. पश्चिम उपनगरातील दहिसर, बोरिवली, मालाड, अंधेरी आणि पूर्व उपनगरातील मुलुंड, भांडुपमध्ये रुग्ण मोठ्या संख्येने आढळू लागले आहेत. त्यातही भांडुपमध्ये गेल्या तीन-चार दिवसांपासून रोज शंभरच्या वर रुग्णांची नोंद होत आहे. संपूर्ण मुंबईतील रुग्णवाढीचा दर १.७१ टक्के असताना एकट्या भांडुपमधील रुग्णवाढीचा दर ३ टक्के आहे. २४ जूनला येथे १०३, २५ जूनला १२१, २६ जून रोजी ११८ रुग्णांची नोंद झाली. त्यामुळे पालिका प्रशासनाने आता कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

दुकानांमध्ये खरेदीसाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होत असल्यामुळे १९ जूनपासून या भागात कठोर टाळेबंदीची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानुसार २६ जूनपर्यंत केवळ अत्यावश्यक दुकाने सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र तरीही रुग्णसंख्या वाढतच असल्यामुळे ही टाळेबंदी ५ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे. या कालावधीत प्रतिबंधित क्षेत्रांत भाजीविक्री, फळविक्री, फेरीवाले, अत्यावश्यक सेवा वगळून सर्व दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. या भागातील लहान रस्ते, गल्ल्या आधीच प्रतिबंधित करण्यात आल्या आहेत.

परळ येथे रविवारी नागरिकांची तपासणी करण्यात आली. (छाया-निर्मल हरिंद्रन)

भांडुपमधील रुग्णसंख्या

१९ जून -	३,३९९
२८ जून -	४,११९
रुग्णसंख्या दुपटीचा कालावधी -	२६ दिवस

मुंबईत १३०० नवे बाधित

मृत्यूदर ५.८ टक्क्यांवर

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : रविवारी दिवसभरात १,३०० नवे करोनाबाधित आढळून आल्याने मुंबईतील एकूण रुग्णांची संख्या ७५ हजारांवर पोहोचली. गेल्या ४८ तासांत २३ रुग्णांचा मृत्यू झाला असून, एकूण मृतांची संख्या ४,३६९ इतकी झाली आहे. त्यामुळे मृत्युदर ५.८ टक्क्यांवर पोहोचला आहे.

रविवारी ८२३ रुग्ण बरे होऊन घरी गेले असून, आतापर्यंत ४३,१५४ रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. मुंबईत सध्या २७,५२४ सक्रिय रुग्ण असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. रविवारी ४८ तासांत २३ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झालेली असली तरी आधीचे ६४ मृत्यू समाविष्ट करण्यात आल्यामुळे मृतांचा आकडा ४,३६९ वर गेला आहे.

अंधेरी पूर्वमध्ये पाच हजार रुग्ण

अंधेरी, जोगेश्वरी पूर्वमध्ये एकूण बाधितांची संख्या ५०८२ झाली आहे. तर अंधेरी, जोगेश्वरी पश्चिम भागांत एकूण बाधितांची संख्या ४३७० झाली आहे. दादर, धारावीमध्ये ४७३९, मालाडमध्ये ४२८१, भांडुपमध्ये ४११९, तर कुर्ल्यामध्ये ४०१७ रुग्णांची नोंद झाली आहे.

गेल्या आठ दिवसांतील रुग्णवाढ

२८ जून -	१३००
२७ जून -	१४६०
२६ जून -	१२९७
२५ जून -	१३६५
२४ जून -	११४४
२३ जून -	८४६
२२ जून -	११२८
२१ जून -	१२४२

...येथे निर्बंध

भांडुप, कांजूरमार्ग, कन्नमवार नगर-विक्रोळी या पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील बराचसा भाग बंद राहणार आहे. त्यात भट्टीपाडा मार्ग, गाढव नाका, टेंभीपाडा, प्रतापनगर रोड, कांजूर व्हिलेज रोड, अशोकनगर रोड, हरियाली व्हिलेज, विक्रोळी रेल्वे स्थानकाचा परिसर, टागोर नगर, कन्नमवार नगर या ठिकाणी कठोर टाळेबंदी लागू असेल.

ठाणे जिल्ह्यात १,३४५ नवे रुग्ण

ठाणे : ठाणे जिल्ह्यात रविवारी १,३४५ नवे करोनाबाधित रुग्ण आढळून आले. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण करोनाबाधितांची संख्या ३० हजार २८९ वर पोहोचली आहे. तर दिवसभरात ३८ जणांचा मृत्यू झाल्याने जिल्ह्यातील एकूण मृतांची संख्या ९८५ इतकी झाली आहे.

ठाणे जिल्ह्यात रविवारी दिवसभरात १ हजार ३४५ नवे रुग्ण वाढले आहेत. त्यामध्ये कल्याण-डोंबिवली शहरातील ३६९, ठाणे शहरातील ३४१, नवी मुंबईतील १९७, भिवंडी शहरातील ५०, अंबरनाथ शहरातील ४५, उल्हासनगर शहरातील १०१, बदलापूर शहरातील ३५, मीरा-भाईंदर शहरातील ११६ आणि ठाणे ग्रामीणमधील ९१ रुग्णांचा समावेश आहे. तर, रविवारी जिल्ह्यात ३८ रुग्णांचा करोनामुळे मृत्यू झाला असून त्यामध्ये ठाण्यातील १४, कल्याणमधील ६, नवी मुंबईतील ४, मीरा-भाईंदरमधील ४, भिवंडीतील ३, ठाणे ग्रामीणमधील ३ तर अंबरनाथ आणि उल्हासनगरमधील प्रत्येकी दोन रुग्णांचा समावेश आहे. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण मृतांचा आकडा ९८५ वर पोहोचल्याची माहिती जिल्हा प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

करोनाबाधित बालकांमध्ये 'कावासकी'सारखी लक्षणे

मुंबईत सात जणांचे निदान; तातडीने उपचार मिळाल्याने जीवनदान

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : प्रतिकारशक्ती प्रमाणापेक्षा अधिक कार्यरत झाल्याने होणाऱ्या 'कावासाकी' या आजारासारखी लक्षणे करोनाबाधित बालकांमध्ये आढळून येत आहेत. मुंबईत सात बालकांमध्ये याचे निदान झाले असून, पुढील काळात प्रमाण वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तविली आहे.

एका १० वर्षीय मुलाला तापासह अंगावर लालसर चट्टे आल्याने महालक्ष्मी येथील 'एन. एच. एसआरसीसी' रुग्णालयात १२ जूनला दाखल करण्यात आले. 'कावासाकी'सारखी लक्षणे आढळल्याने उपचार सुरू करण्यात आले. काही दिवसांतच त्याची प्रकृती स्थिर झाली असून घरीदेखील सोडले आहे. करोनाउद्रेकानंतर अमेरिका, इटली, फ्रान्समध्ये करोनाबाधित बालकांमध्ये कावासकीसारखी लक्षणे आढळल्याचे समोर आले होते. जागतिक आरोग्य संघटनेने याला 'मल्टिसिस्टम इनफ्लामॅटरी सिन्ड्रोम' असे नाव दिले आहे. चेन्नई आणि केरळमध्येही काही बालकांमध्ये ही लक्षणे आढळली आहेत. साधारणपणे बाधा झाल्यानंतर दोन-तीन आठवड्यांनंतर ही लक्षणे दिसून येत असल्याचे कोकिळाबेन धीरुभाई अंबानी रुग्णालयातील संसर्गतज्ज्ञ डॉ. तनू सिंघल यांनी सांगितले.

या आजारात रक्तदाब कमी झाल्याने हृदयाला होणारा रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांना अपाय होण्याची शक्यता असते. परिणामी काही वेळेस अचानक हृदयविकाराचा झटका येण्याचा संभव असतो. त्यामुळे अशी लक्षणे दिसल्यानंतर तातडीने रुग्णाला जवळच्या रुग्णालयात दाखल करणे गरजेचे आहे, असे एसआरसीसी रुग्णालयातील अतिदक्षता विभागाच्या प्रमुख आणि रुग्णालयाच्या संचालक डॉ. सोन्नू उडानी यांनी सांगितले.

वाडिया रुग्णालयातही पाच करोनाबाधित बालकांना कावासकीसारखी लक्षणे आढळली आहेत. यातील चार जणांना घरी सोडले असून एकावर उपचार सुरू आहेत. ही बालके पाच ते आठ वयोगटातील असून एक १४ वर्षीय असल्याचे वाडिया रुग्णालयाच्या कार्यकारी अधिकारी डॉ. मिनी बोधनवाला यांनी सांगितले.

कावासाकी म्हणजे काय?

संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव झाल्यानंतर त्याच्या विरोधात लढण्यासाठी शरीराची प्रतिकारक शक्ती कार्यरत होते. काही वेळेस ही प्रतिकारक शक्ती प्रमाणापेक्षा अधिक वाढून शरीरावरच परिणाम करायला लागते. याला ऑटोइम्युन आजार म्हणतात. कावासकी हा असाच ऑटोइम्युन आजार असून संसर्गजन्य साथीनंतर उद्भवल्याचे संदर्भ आहेत.

प्रमुख लक्षणे

ताप येणे, हात, पाय, मानेवर लालसर चट्टे येणे, डोळे लाल होणे (डोळे येणे), ओठ, जीभ लाल होणे, पोटदुखी, अतिसार ही याची प्रमुख लक्षणे असून करोनाचा संसर्ग झालेल्या सहा ते १४ वयोगटातील बालकांमध्ये आढळून येतात.

निदानात अडचण...

लक्षणे आढळलेल्या बालकांची आरटीपीसीआर चाचणी नकारात्मक येत असल्याने अँटिबॉडी चाचणी करणे अत्यावश्यक आहे. यातूनच त्यांना संसर्ग आधी झाल्याचे सिद्ध होऊ शकते; परंतु ही चाचणी अधिकृतरीत्या उपलब्ध नसल्याने एसआरसीसीच्या बालकांची करता आलेली नाही. तेव्हा ही चाचणी उपलब्ध करणे अत्यावश्यक असून याबाबत मुंबई पालिकेलाही कळविल्याचे डॉ. उडानी यांनी सांगितले.

शिवसेना भवनातील आणखी दोघे बाधित

मुंबई : शिवसेना भवनातील आणखी दोघांना करोनाची लागण झाल्याचे समोर आले आहे. तेथे नियमित ये-जा करणाऱ्या एकाला संसर्ग झाल्याचे उघड झाल्यानंतर गेल्या आठवड्यात ही वास्तू बंद करण्यात आली होती.

आता आणखी दोघांना करोनाची लागण झाल्याने शिवसेना भवन पुढील काही काळ बंद ठेवण्यात येणार आहे. गेल्या आठवड्यात करोनाची बाधा झालेली व्यक्ती ही शिवसेना भवनातील कर्मचारी नव्हती, असे सांगण्यात आले होते. त्या व्यक्तीच्या संपर्कात आल्याने बाधित झालेले दोघे रुग्ण हे शिवसेना भवनातील कर्मचारी असल्याचे सांगण्यात आले.

५५ वर्षीय पोलिसाचा करोनाने मृत्यू

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : धारावी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले हवालदार शिवाजी गायकवाड (५५) यांचा करोनाने मृत्यू झाला आहे. दीड महिन्यापासून ते रुग्णालयात उपचार घेत होते. मुंबई पोलीस दलातील हा ३८ वा मृत्यू आहे.

मूळचे साताऱ्यातील आसनगावचे रहिवासी असलेले गायकवाड हे माहीम पोलीस वसाहतीत वास्तव्याला होते. १५ मे रोजी त्यांना सेव्हन हिल रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. मूत्रपिंड आणि फुफ्फुसांमध्ये बिघाड झाल्याने पुढील उपचारांसाठी त्यांना रिलायन्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गेल्या दीड महिन्यापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. शनिवारी रात्री दहाच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

मुंबई पोलीस दलातील अडीच हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना करोनाची लागण झाली असून, त्यांच्यापैकी सुमारे दोन हजार जण आतापर्यंत बरे होऊन घरी परतले आहेत.